# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था )
२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे -४११ ००१.

Email : bartidelhi19@gmail.com Website : http//:barti.maharashtra.gov.in

## अनुसूचित जातीतील उमेदवारांसाठी UPSC (Civil Services) Examination-2023 स्पर्धा परीक्षेच्या (पूर्व व मुख्य परीक्षा) पूर्वतयारी प्रशिक्षणाकरिता दिल्ली येथील नामवंत कोचिंग इंस्टीटयूटमध्ये अनिवासी व नि:शुल्क प्रशिक्षण

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील **३०० उमेदवारांना बार्टीमार्फत दिल्ली येथे प्रशिक्षणासाठी पुरस्कृत (Sponsor) करण्यात येत आहे.** उमेदवारांची निवड करण्याकरिता **COMMON ENTRANCE TEST (BARTI- UPSC-CET-2023)** आयोजित करण्यात येत असून त्याकरिता ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे.

**प्रशिक्षण कालावधीमध्ये उमेदवारास मिळणारे लाभ (प्रती विद्यार्थी) –**

१. दिल्ली येथील कोचिंग संस्थेस देण्यात येणारी संपूर्ण कोचिंग फी
२. विद्यावेतन प्रती माह रक्कम रु. १२,०००/- (उपस्थितीनुसार)
३. पहिल्या महिन्यातील आर्थिक सहाय्य रक्कम रु. ३,०००/-
४. प्रवासाकरिता एकूण रक्कम रु. १००००/-

**Online अर्ज करण्याचा कालावधी - दि. १० जून ते २५ जून २०२२**

**टीप:** Online अर्ज करण्यासाठी **http://barti.maharashtra.gov.in > NOTICE BOARD > BARTI-UPSC-CET-2023-APPLY ONLINE.**

तसेच विद्यार्थी पात्रतेचे निकष व अन्य तपशीलबाबत अधिक माहितीसाठी **http://barti.maharashtra.gov.in >NOTICE BOARD > BARTI-UPSC-CET-2023- ADVT and GUIDELINES** या लिंकवर क्लिक करा.

संपर्क :०२०-२६३३३३३०/ २६३४३६००

श्री धम्मज्योती गजभिये
**महासंचालक, बार्टी.**

**Advt./UPSC-UPSC-CET-2023/ / /2022/**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन
व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
२८ क्वीन्स् गार्डन, जुन्या सर्किट हाऊसजवळ, पुणे-४११ ००१. दूरध्वनी क्र. : ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३०
● E-mail : directorbarti@gmail.com ● Website : https://barti.maharashtra.gov.in ● फॅक्स :०२०-२६३३ ३५९६

# महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील उमेदवारांना दिल्ली येथील नामांकित कोचिंग संस्थेमध्ये संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा परीक्षा-२०२३ साठी प्रशिक्षण योजना

**टिप – उमेदवारांची निवड BARTI-UPSC-CET-2023 या निवड चाळणी परीक्षेतील प्राप्त गुणांनुसार करण्यात येणार आहे.**

| | |
|---|---|
| **Online अर्ज करण्याचा कालावधी** | **दि. १० जून ते २५ जून २०२२** |

**BARTI-UPSC-CET-2023 या चाळणी परीक्षेकरिता अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना-**

१. पात्र उमेदवारांला वेब बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज https://barti.maharashtra.gov.in >Notice Board > BARTI-UPSC-CET-2023>APPLY ONLINE या वेबसाईट द्वारे दि. १० जून ते २५ जून २०२२ दरम्यान सादर करणे आवश्यक राहील.

२. अर्ज करतेवेळी उमेदवाराने त्यांचे नाव, जन्म दिनांक, ईमेल आयडी, आधार कार्ड क्रमांक, मोबाईल क्रमांक, निवासाचा पत्ता, परीक्षा केंद्र इ. माहिती अचूक भरावी.

**३. परीक्षा प्रवेश पत्र व परीक्षेचा दिनांक याबाबत बार्टी संकेतस्थळावर घोषणापत्र प्रसिद्ध करण्यात येईल.**

**४. पात्रता**:

- महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीचा उमेदवार असावा.
- उमेदवार पदवी परीक्षा उत्तीर्ण असावा.
- उमेदवाराचे वय दि. १ ऑगस्ट २०२२ रोजी २१ ते ३७ वर्षापर्यंत असावे.
- तसेच उमेदवार संघ लोकसेवा आयोग -नागरी सेवा परीक्षा - २०२३ परीक्षेस पात्र असावा.

टिप : ज्या उमेदवारांनी यापूर्वी बार्टी मार्फत राबविल्या जाणाऱ्या संघ लोकसेवा आयोग - नागरी सेवा परीक्षेचे प्रशिक्षण (उदा. यशदा, Pre-IAS केंद्र, दिल्ली, महाराष्ट्र) घेतले आहे असे उमेदवार अर्ज करण्यास अपात्र आहेत. यापूर्वी उमेदवाराने बार्टीच्या प्रशिक्षणाचा लाभ घेतला असल्यास संबधित उमेदवाराची प्रशिक्षणातील उमेदवारी रद्द करण्यात येईल. परंतु बार्टी मार्फत आयोजित MPSC, IBPS, Skill Develpoment इ. प्रशिक्षणातील लाभार्थी दिल्ली येथील यु.पी.एस.सी. प्रशिक्षणाकरिता पात्र आहेत.

५. एका उमेदवाराने एकच online अर्ज भरावा.

६. BARTI-UPSC-CET-2023 करिता महाराष्ट्रातील पुणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या ठिकाणी परीक्षा केंद्र असेल. उमेदवारांनी online अर्ज करतेवेळी योग्य परीक्षा केंद्र निवडावे. एकदा दिलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीत पुन्हा बदलवून देण्यात येणार नाही. परीक्षेस उपस्थित राहण्यासाठी

उमेदवारास कोणताही प्रवासभत्ता प्रदान करण्यात येणार नाही.

४. या परीक्षेचे प्रवेशपत्र https://barti.maharashtra.gov.in>Notice Board> BARTI- UPSC-CET-२०२३-ADMIT CARD या लिंकवर उपलब्ध करून देण्यात येईल. प्रवेशपत्रावर उमेदवारास परीक्षेची तारीख, वेळ व परीक्षा केंद्र दिले जाईल.

५. कोचिंग क्लासची निवड ही उमेदवाराचे प्रवेश परीक्षेतील गुण व संबंधित कोचिंग क्लासमधील उपलब्ध प्रवेश क्षमता यांच्या आधारे करण्यात येईल. कोचिंग क्लास वाटपाचे अंतिम अधिकार मा. महासंचालक, बार्टी, पुणे यांना राहतील.

६. बार्टी मार्फत निवडण्यात आलेल्या कोचिंग क्लासला वैकल्पिक विषयाचे प्रशिक्षण उपलब्ध असल्यास त्याच कोचिंग क्लासमध्ये प्रवेश घेणे उमेदवारांवर बंधनकारक आहे. निवडण्यात आलेल्या कोचिंग क्लासमध्ये विद्यार्थ्यांना GS आणि CSAT आणि वैकल्पिक विषय यांचे एकत्रित प्रशिक्षण घेणे विद्यार्थ्यांकरिता बंधनकारक आहे. वैकल्पिक विषयासाठी बार्टीमार्फत निवडण्यात न आलेल्या एखाद्या कोचिंग क्लासचा विद्यार्थ्यांनी आग्रह धरल्यास ते ग्राह्य धरण्यात येणार नाही.

७. प्रशिक्षणास रुजू झाल्यानंतर बायोमेट्रिक हजेरीच्या आधारे उमेदवारांना विद्यावेतन अदा करण्यात येईल. संबधित प्रशिक्षण संस्थेकडून प्रत्येक महिन्याचे उपस्थिती पत्रक प्राप्त झाल्यावरच विद्यावेतन अदा करण्यात येईल. प्रत्येक दिवशी विद्यार्थ्याने क्लासला उपस्थित राहण्याकरिता येता-जाता (in-out) दोन्ही वेळचे thumb impression विचारात घेतले जाईल. एका वेळेला तशी नोंद नसल्यास त्या दिवसाची अनुपस्थिती ग्राह्य धरून विद्यावेतन अदा केले जाणार नाही. विद्यार्थ्यांनी कोचिंग क्लासला उपस्थित न रहाता बार्टीकडे विद्यावेतनाकरिता दबाव आणणे याकरिता विद्यार्थ्यास प्रशिक्षणाकरिता अपात्र ठरविले जाईल.

८. विद्यार्थी निवड अंतिम करण्यापूर्वी संबंधितांचे जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र व इतर शैक्षणिक कागदपत्र यांची पडताळणी बार्टी, पुणे येथे करण्यात येईल.

९. बार्टी संस्थेने निवडलेल्या दिल्ली येथील नामांकित कोचिंग संस्थेमध्ये घोषित केलेल्या तारखेस उमेदवाराने रुजू होणे बंधनकारक राहील. जे उमेदवार दिलेल्या तारखेपासून विहित मुदतीमध्ये दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थेमध्ये रुजू होणार नाहीत, अशा उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल. त्या रिक्त जागांसाठी प्रतीक्षा यादीतील उमेदवारांची निवड घोषित करण्यात येईल.

१०. निवड यादीतील उमेदवारांची कागदपत्र पडताळणी करण्यात येईल. कागदपत्र पडताळणीबाबत निवड झालेल्या उमेदवारांना त्यांनी online फॉर्म भरताना दिलेल्या ईमेलवर किंवा बार्टीच्या Notice Board वर कळविण्यात येईल. उमेदवारांनी स्वत:चा ईमेल व बार्टी संकेतस्थळावर घोषित केलेली माहिती वेळोवेळी तपासावी. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराच्या हलगर्जीपणामुळे त्यांच्या होणाऱ्या नुकसानीस बार्टी संस्था उत्तरदायी राहणार नाही.

११. निवड झालेल्या उमेदवारांना दिल्ली येथील नामांकित संस्थेमध्ये संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा परीक्षा २०२३ च्या पूर्व व मुख्य परीक्षा पूर्व तयारी प्रशिक्षणाचा लाभ घ्यावयाचा असेल तर उमेदवारास बार्टी संस्थेसोबत रु. १०० च्या स्टँपपेपरवर प्रशिक्षणातील अटी व नियमांच्या पालनाबाबतचा करार करावा लागेल. करारनामा सही करतेवेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. कागदपत्रांची पडताळणी ही पुणे येथे करण्यात येईल. जर निवड यादीतील उमेदवार सदर करार करण्यास

कोणत्याही कारणास्तव अनुपस्थित राहिल्यास त्यांची प्रशिक्षणाकरिताची उमेदवारी रद्द ठरविण्यात येईल. तसेच या प्रशिक्षणामधून मिळणाऱ्या कोणत्याही लाभास तो पात्र ठरणार नाही.

१२. सदर प्रशिक्षणाचा लाभ घेण्याकरिता कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा कमी घोषित करण्यात आली आहे. अन्यथा उमेदवाराचा प्रशिक्षणासाठी प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाही. याबाबत कोणत्याही राजकीय किंवा शासकीय दबावतंत्राचा वापर केल्यास उमेदवारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

१३. प्रशिक्षाणार्थ्यांना प्रशिक्षणादरम्यान अर्थार्जनास (नोकरी, व्यवसाय करण्यास) मनाई आहे.

१४. जर उमेदवार खाजगी अथवा शासकीय, निमशासकीय नोकरी करत असेल तर दिल्ली येथील प्रशिक्षणाचा लाभ घेण्याकरिता सक्षम प्राधिकाऱ्यांकडून रजा मंजूर केल्याबाबतचे प्रमाणपत्र बार्टी कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.

१५. उमेदवारास कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षण सोडायचे असल्यास त्या उमेदवारास प्रशिक्षणादरम्यान त्याकरिता संस्थेने केलेला खर्च पुन्हा बार्टी संस्थेस द्यावा लागेल.

१६. विद्यार्थ्यांची निवड यादी बार्टी संस्थेच्या **https://barti.maharashtra.gov.in**. संकेत स्थळावर घोषित करण्यात येईल.

## परीक्षेचे स्वरूप-

यु.पी.एस.सी. अभ्यासक्रमाचे आधारे परीक्षा दोन सत्रामध्ये आयोजित केली जाईल. पेपर I (General Studeis) व पेपर II (CSAT) प्रत्येकी २०० गुण प्रमाणे एकूण ४०० गुणांची चाळणी परीक्षा घेण्यात येईल. प्रत्येक सत्राकरिता दोन तास अवधी देण्यात येईल.

प्रश्नपत्रिका मराठी व इंग्रजी दोन्ही माध्यमामधून उपलब्ध करून देण्यात येईल.

| पेपर | विषय | प्रश्नसंख्या | एकूण गुण | वेळ व कालावधी |
|---|---|---|---|---|
| I | General Studies (GS) | १०० | २०० | **सकाळी ११.०० ते ०१.००**<br>(२ तास) |
| II | Civil Services Aptitude Test (CSAT) | ८० | २०० | **दुपारी ०३.०० ते ५.००**<br>(२ तास) |
| | | **एकूण** | **४००** | **४ तास** |

a) BARTI- UPSC -CET- 2023 करिता पेपर-I (GS) आणि पेपर—II (CSAT) या दोन्ही पेपरमधील उपस्थिती अनिर्वाय आहे. जर उमेदवार कोणत्याही पेपर मध्ये अनुपस्थित असल्यास सदर प्रशिक्षणास त्यांची निवड ग्राह्य धरण्यात येणार नाही.

b) उत्तरपत्रिका Negative Marking प्रमाणे तपासण्यात येईल. प्रत्येक चुकीच्या प्रश्नासाठी त्या प्रश्नाच्या एकूण गुणांपैकी १/३ गुण वजा केले जातील.

c) पेपर II (CSAT) चे स्वरूप हे पात्रता पेपर (Qualifying) असे आहे. पेपर II (CSAT) मध्ये किमान ३३% किंवा त्यापेक्षा जास्त गुण असणे आवश्यक आहे. असेच उमेदवार निवडीसाठी पात्र राहतील.

d) ज्या उमेदवारांना पेपर I (GS) मध्ये ऋण गुण असतील ते उमेदवार निवडीकरिता अपात्र राहतील .

e) पात्र उमेदवारांची पेपर I (GS) मधील गुणांच्या आधारे अंतिम निवड यादी घोषित करण्यात येईल.

**आरक्षणानिहाय विद्यार्थी संख्या-**

| **तपशील** | **एकूण** |
|---|---|
| अ) सर्वसाधारण | १६५ |
| ब) महिला | ९० |
| क) दिव्यांग (५%) | १५ |
| विशेष बाब (५%) | १५ |
| वंचित घटक (५%- महिला व सर्वसाधारण निवड यादीमध्ये समाविष्ट न झालेल्या उपजाती, वाल्मिकी व तत्सम जाती, होलार, बेरड, मातंग, मांग, मादगी इ.) | १५ |
| **एकूण** | **३००** |

- दिव्यांग उमेदवाराकडे ४०% किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांग असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र आवश्यक आहे. दिव्यांग उमेदवारांच्या आरक्षित जागेवर पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास दिव्यांग उमेदवारांना प्रशिक्षणाची संधी मिळावी या व्यापक दृष्टीकोनातून पेपर II मधील पात्रतेची अट शिथिल करण्यात येवून त्यांना प्रशिक्षणाची संधी देण्यात येईल.
- **वंचित घटक**- अनुसूचित जातीतील वाल्मिकी व तत्सम जाति होलार, बेरड, मातंग, मांग, मादगी इ. जातीतील उमेदवारांचे जर निवड यादीमध्ये प्रतिनिधित्व मिळत नसेल अशाच उपजातीतील उमेदवारांची सदर प्रशिक्षणामध्ये एकूण जागांच्या ५% जागा वंचित घटक अंतर्गत राखीव ठेवण्यात येतील त्याकरिता अनुसूचित जातीतील उमेदवारांचा निवड प्रक्रियेत सहभाग बंधनकारक आहे. वंचित घटक म्हणजेच पुरुष व महिला यांच्या सर्वसाधारण निवड यादीमध्ये ज्या उपजातीचा एकही विद्यार्थी समाविष्ट नाही अशा उमेदवारांना वंचित घटक अंतर्गत ५% म्हणजेच एकूण १५ जागांसाठी प्रत्येक उपजातीला समसमान प्रशिक्षणाची संधी देण्यात येईल. या निवडीबाबत बदल करण्याचे अधिकार मा. महासंचालक, बार्टी यांचेकडे राखीव असतील.

**कागदपत्र पडताळणीकरिता आवश्यक कागदपत्रे –**

१. रु. १०० चा कोरा स्टँप पेपर

**२.** दहावी प्रमाणपत्र/जन्माचा दाखला (SSC certificate or Date of Birth Certificate )

**३.** पदवी प्रमाणपत्र (Certificate of Graduation)

**४.**जात प्रमाणपत्र ( Caste Certificate)

५. जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate)

६. कौटुंबिक उत्पन्नाचा दाखला (Income Certificate of family (income from all the sources))

७. अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

८. BARTI- UPSC -CET-2023 परीक्षेचे प्रवेशपत्र (admit card)

९. आधार कार्ड/ओळख पत्र/पॅनकार्ड/ वाहन चालक परवाना (Driving License)/ निवडणूक ओळखपत्र

१०. पासपोर्ट आकाराचे दोन फोटो

११. दिव्यांग करिता आरक्षित जागेकरिता ४०% किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

## लाभाचे स्वरूप

**BARTI-UPSC-CET-2023 या निवड चाळणी परीक्षेमधून निवडण्यात आलेल्या उमेदवारांना पुढील सुविधा/ लाभ देण्यात येतील-**

१. बार्टी संस्थेमार्फत दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थेचे प्रशिक्षण शुल्क देण्यात येते.
२. सदर प्रशिक्षण अनिवासी असल्याने उमेदवारांना दिल्ली येथील निवास व भोजनाची व्यवस्थेकरिता प्रती माह कमाल रक्कम रु. १२०००/- विद्यावेतन देण्यात येते. विद्यावेतन करिता विद्यार्थ्यांची उपस्थिती ग्राह्य धरण्यात येईल.
३. दिल्ली येथे प्रशिक्षणाच्या सुरवातीस जाण्याकरिता रु. ५०००/-(एकदा) व प्रशिक्षण संपल्यानंतर परतीच्या प्रवासाकरिता रु. ५०००/- (एकदा) प्रवास खर्च देण्यात येतो.
४. पहिल्या महिन्यातील आर्थिक सहाय्य रु. ३०००/- (एकरकमी)

**महत्वाचे-**

**१. BARTI-UPSC-CET-२०२३ निवड चाचणी परीक्षा कार्यपद्धती व निकाल याबाबत अद्ययावत माहितीसाठी उमेदवारांनी बार्टी संकेतस्थळावर (बार्टी वेबसाईट) यास वेळोवेळी भेट देणे आवश्यक राहील.**

**२. उपरोक्त बाबींमध्ये बदल करण्याचे अंतिम अधिकार मा. महासंचालक यांचे असतील. प्रशिक्षण घेतल्यानंतर केंद्रीय अथवा राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकारी पदावर निवड झाल्यास आदेशाची प्रत व त्याबाबत माहिती बार्टीच्या barticec16@gmail.com ईमेल वर कळविणे बंधनकारक राहील.**

## Detailed description of question paper for BARTI-UPSC-CET- 2023

**PAPER - I (General Studies)**

**Number of Question – 100 (**Objective type Multiple Choice Question)

**Total Marks** – **200** (2 Marks for each question)

**Negative Marking** – For each wrong answer One-third of the marks assigned to that question will be deducted as penalty

**PAPER II- (Civil Services Aptitude Test - CSAT)**

**Number of Question – 80 (**Objective type Multiple Choice Question)

**Total Marks** – **200** (2.5 Marks for each question)

**Negative Marking** –For each wrong answer One-third of the marks assigned to that question will be deducted as penalty

**Syllabus** - **As per UPSC Examination Norms**

**Note: Any change / modification in the above matter will be notified only on the website https://barti.maharashtra.gov.in Candidates are advised to see the website time to time.**

**Help desk-**

Email ID : bartidelhi19@gmail.com

Contact number : 020-26333330/26343600

Time : 10.00 am to 6.00 pm